**वादी साक्षीदार क्र.२ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१, २/१ ते २/४, ३/१ ते ३/४, ४/१ ते ४/२ व ५ तर्फे विधीज्ञ श्री. एस. बी. मंदाडे यांच्यामार्फत...**

०२. मी उपधिक्षक भूमी अभिलेख अहमदपूर या कार्यालयामध्ये छाणणी लिपीक व मोजणीदार म्हणून कार्यरत होतो. मी सध्या सेवानिवृत्त आहे. मी सेवेत छाणणी लिपीक म्हणुन रुजु झालो होतो. माझे शिक्षण आय.टी.आय सर्वेयर ट्रेड झालेले आहे. जमीन मोजणीच्या दोन पध्दती आहेत. त्यातील पहिली प्लेन टेबल पध्दत व दुसरी ई.टी.एस. मशीन पध्दत आहे. लांजी येथील गट क्र. १६० मधील जमीनीची मी मोजणी केलेली आहे. मी ती मोजणी प्लेन टेबलच्या सहाय्याने केलेली आहे. मोजणी करण्याचे प्रशिक्षण मी औरंगाबाद येथे घेतलेले आहे. मोजणी कामी आमच्या कार्यालयातर्फे मी व एक शिपाई गेलो होतो. मोजणीच्या नोटीसा मी आजूबाजुच्या शेतकऱ्यांना दिल्या होत्या. मोजणीकामी आजुबाजुचे सर्व धारक हजर होते किंवा कसे हे मला आठवत नाही. आजुबाजुच्या शेतकऱ्यांना नोटीस काढल्याबाबत माझ्याकडे त्या नोटीसा पोस्टाने काढल्याबाबतची कार्यालयीन प्रत आहे. त्या नोटीसा त्यांना पोचल्याबाबत माझ्याकडे पुरावा उपलब्ध नाही. गट क्र. १६० चा जुना सर्वे नंबर ४५/१ होता. सर्वे नंबर ४५/१ चे संपूर्ण क्षेत्र किती होते हे सांगू शकत नाही. कारण त्या सर्वेमध्ये बरेच गट नंबर होते. मी जुना सर्वे नंबर ४५/१ पैकी गट नंबर १६० ची मोजणी केली. गट क्र. १६० चे एकुण क्षेत्र ३ हे. ८० आर होते. मी वादीच्या क्षेत्राची मोजणी केलेली नाही. मी पुर्ण गटाची मोजणी केलेली आहे. मी मोजलेले क्षेत्र मुळ टीपण अभिलेखाप्रमाणे बसवलेले आहे. मी मुळ टिप्पन आज सोबत आणलेले आहे. नकाशातील माप मुळ टीपणाप्रमाणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १६० चे पुर्ण क्षेत्र बसत नसल्याने मी गट क्र. १५६ चे अतिक्रमण दाखविलेले आहे. मी गट नंबर १६० च्या दक्षिणेचा गट नंबर मोजला किंवा कसे हे मला सांगता येत नाही. गट नं. १६० च्या दक्षिणेला १५६ व १५७ आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १६० व १५६ च्या मध्ये पुर्व पश्चीम उत्तरेकडे असलेला धुरा गट नं. १५६ च्या शेवटपर्यंत गेलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या धुऱ्याची उंची पाच फुट होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या धुऱ्याची रुंदी पाच ते सात फुट होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या धुऱ्यावर कडुलींब, आपटा व बोरीचे दहा ते पंधरा वर्ष जुने झाडे आहेत. मी मोजणी दिनांक १२.०६.२०१० रोजी केलेली आहे. दि. २३०४.२०१२ रोजी हद्दी खुणा कायम केल्या. मी छाणणी लिपीक व मोजणीदार असल्याने तसेच अभिलेख उपलब्ध करुन हद्दी खुणी निश्चीत

करण्यास विलंब झालेला आहे.हद्दी खूणा निश्चीत करतेवेळी गट नं. १५६ चे धारक हजर होते किंवा कसे ते मी सांगू शकत नाही. हद्दी खुणा निश्चीत करतेवेळी मी पंचनामा केला नाही. मोजणीच्या पंचनाम्यावर गट नं. १५६ च्या धारकांच्या सह्या आहे किंवा नाही ते मी सांगू शकत नाही. गट नं. १५६ मध्ये अतिक्रमण झाल्याबाबत गट नं. १५६ मधील धारकांना मी कल्पना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीसोबत संगणमत करुन दावा मिळकतीच्या लगतच्या शेतकऱ्यांना नोटीस न देता तसेच पंचनाम्यावर सह्या न घेता खोटा पंचनामा करुन मी खोटे अतिक्रमण दाखविलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीसोबत संगणमत करुन मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

सरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.04.09 15:33:27 +0530

(**एस. डी. वडगावकर**)

दिनांक ०९.०४.२०२६

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
अहमदपूर.